सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :-roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्रमांक.:- विकाअ/शिक्षण/२०२४/ 3035
दिनांक :- 01 OCT 2024

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व व्यावसायिक तांत्रिक अभ्यासक्रमाच्या संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- राज्यातील सर्व विद्यापिठ व शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी विवीध व्यावसायिक पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी निश्चित केलेल्या शुल्काची माहिती महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर व आवारातील सूचना फलकावर प्रसिध्द करण्याबाबत.**

**संदर्भ :-** मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/शिक्षण शुल्काची माहिती/२०२४/७८० दिनांक २४/०९/२०२४.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना संबंधीत विद्यापिठ / महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई तसेच शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई / फी निश्चिती समिती, मुंबई यांनी निश्चित केलेल्या शुल्काची आकारणी करणे बंधनकारक असून त्यांनी निर्धारित केलेले शुल्क व इतर शुल्क आपल्या संस्थेच्या संकेतस्थळावर व सूचना फलकावर प्रसिध्द करण्यातबाबत संदर्भीय पत्रान्वये या कार्यालयास कळविलेले आहे. संदर्भीय पत्राची प्रत सोबत जोडण्यात येत आहे.

त्यानुषंगाने आपल्या संस्थेचे विविध शुल्क आपल्या महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर व दर्शनी भागावरील सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सहपत्र :- वरील प्रमाणे.

**( मनोज म. अंधारे )**
**प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण,**
अमरावती.

प्रत :- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४५०, ४४२, ४४३

ई-मेल - desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट : http://dte.maharashtra.gov.in

क्र. २/एनजीसी/शिक्षण शुल्काची माहिती/२०२४/ ७८० दिनांक : 24 SEP 2024

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई / पुणे/ नाशिक/ छत्रपती संभाजीनगर/ अमरावती/ नागपूर

संचालक,

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

विषय : राज्यातील सर्व विद्यापीठ व शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी विवीध व्यावसायिक पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी निश्चित केलेल्या शुल्काची माहिती महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर व आवारातील सूचना फलकावर प्रसिध्द करण्याबाबत...

संदर्भ : मा.संस्थापक अध्यक्ष, दीपू फाऊंडेशन, पुणे यांचे दि.१६.९.२०२४ रोजीचे निवेदन

संदर्भांकित पत्रांच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या विभागांतर्गत पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना संबंधित विद्यापीठ / महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई तसेच शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई / फी निश्चिती समिती, मुंबई यांनी निश्चित केलेल्या शुल्काची आकारणी करणे बंधनकारक आहे.

सबब आपल्या विभागाच्या कार्यकक्षेतील सर्व तांत्रिक व्यावसायिक पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थानां विद्यापीठ / महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई तसेच शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई / फी निश्चिती समिती, मुंबई यांनी निर्धारीत केलेले शुल्क व इतर शुल्क महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर व सूचना फलकावर प्रसिद्ध करण्याबाबत कळविण्यात यावे. तशा सूचना आपल्या स्तरावरून सर्व संस्थांना विनाविलंब देण्यात याव्यात.

(डॉ.सुनिल भामरे)

सहसंचालक,

तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : माहितीकरीता सादर

१) मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ३२

२) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठ/ अभिमत विद्यापीठे/स्वयं अर्थसहायित विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य

३) मा.संस्थापक अध्यक्ष, दीपू फाऊंडेशन, पुणे यांना ई-मेलव्दारे (आय.डी- deepufoundation1984@gmail.com)

D:\DTENS1_Backup 16 Dec 2023\2024\General Correspondence\RD Letter_Fee display on Institute website.docx